## खरेदी नोटीस क्रमांक १ / २०२४.

क्रमांक :- रा.अ./ले.सा.वि./आस्था-१२/वाहतूक करार /२०२४-२५/ब - 40 मुंबई, दिनांक - 9/07/2024

**विषय :- वस्तू व सेवा कर कार्यालय, माझगाव व वांद्रे येथील कार्यालयांसाठी एक वर्ष कालावधीकरीता संपूर्ण महाराष्ट्र राज्यातील लेखनसामुग्रीचा वाहतूक करार करण्याकरीता दरपत्रके मागविणेबाबत.**

वस्तू व सेवा कर कार्यालय, माझगाव व वांद्रे येथील कार्यालयांसाठी लागणाऱ्या लेखनसामुग्रीचा पुरवठा करण्यासाठीच्या संपूर्ण महाराष्ट्र राज्यातील वाहतूक कराराची दरपत्रके व्दि-लिफाफा पध्दतीनं दि. १० जूलै, २०२४ ते १६ जूलै , २०२४ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत मागविण्यात येत आहेत. दरपत्रके सादर करण्याचा शेवटचा दिनांक १६ जूलै, २०२४ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत असून प्राप्त झालेली दरपत्रके दिनांक १८ जूलै, २०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता उघडण्यात येतील. कोणतीही दरपत्रके स्विकारण्याचा किंवा नाकारण्याचा हक्क राज्यकर सहआयुक्त (मुख्यालय-२), महाराष्ट्र राज्य, मुंबई राखून ठेवत आहेत. या संदर्भात लेखनसामुग्री विभागाशी करार झाल्यापासून पुढील एक वर्षाच्या कालावधीकरीता स्विकृत केलेल्या दराप्रमाणे वस्तू व सेवा कर कार्यालय, माझगाव व वांद्रे येथील कार्यालयांसाठी लागणारी लेखनसामुग्री वाहतूक करार एक वर्ष कालावधीकरीता करणे बंधनकारक राहील. तसेच दरपत्रक स्विकारल्यानंतर तांत्रिक बाबीमुळे प्रशासनाची आगामी वर्षाकरीता निविदा मागविण्याची प्रक्रिया लांबणीवर जात असेल तर प्रशासकीय विनंतीनुसार सदर पुरवठा स्विकृत केलेल्या दरात जास्तीत जास्त वाढीव ९० दिवस कालावधी पर्यत पुरवठा करणे बंधनकारक राहील.

तरी सादर करावयाची दरपत्रके राज्यकर सहआयुक्त (मुख्यालय-२), महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या नावाने राज्यकर अधिकारी (आस्थापना -१२), लेखनसामुग्री विभाग, तळ मजला, जूनी इमारत, वस्तू व सेवा कर भवन, माझगांव, मुंबई - ४०० ०१० या पत्त्यावर मोहोरबंद पाकिटातून दि. १६ जूलै, २०२४ रोजी सायंकाळी ५.०० पाठविण्यात यावेत. सदर दरपत्रकाबाबत काही इतर माहिती हवी असल्यास या कार्यालयाच्या ०२२-२३७६०८८९ या दूरध्वनीवर संपर्क साधावा, ही विनंती.

**विशेष सुचना - राज्यकर सहआयुक्त (मुख्यालय-२), महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्यावतीने राज्यकर अधिकारी (आस्था-१२) लेखनसामुग्री विभाग, वस्तू व सेवा कर भवन, माझगांव येथे पुरवठा करावा लागेल.**

ठिकाण :- मुंबई.

दिनांक :- ०९.०७.२०२४.

सोबत :- अटी व नियम.

**(नितीन च. शालीग्राम)**
**राज्यकर सहआयुक्त (मुख्यालय-२),**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई.**

# व्यापारी निविदा नमुना

1. कंपनीचे/संस्थेचे नाव : ---------------------------------------------

मी/आम्ही ---------------------------------------- खाली स्वाक्षरी करणार, या निविदेसोबत जोडलेल्या तपशीलाप्रमाणे वस्तू व सेवा कर विभाग, माझगांव, मुंबई यांच्या लेखनसामुग्री कार्यालयातील सन 2021–2022 या कालावधीतील लेखनसामुग्रीच्या वाहतुकीकरीता (संपूर्ण महाराष्ट्र राज्यातील) वाहतुक करार करण्यासाठी सोबत दिलेल्या नियम, अटी व शर्तीच्या अधिन राहून दरपत्रके सादर करत आहे/आहोत.

2. संपूर्ण पत्ता व दूरध्वनी कमांक : ---------------------------------------------
---------------------------------------------
---------------------------------------------

3. तकारीसाठी दूरध्वनी कमांक : ---------------------------------------------
(बदल झाल्यास कार्यालयास कळविणे बंधनकारक)

4. कामाचे स्वरूप : सोबत जोडलेल्या तपशीलाप्रमाणे

5. वाहतुकीकरीताचे दर : खाली नमूद केल्याप्रमाणे

| मुंबई विभागासाठी वाहतूकीचे दर (शासकीय मुद्रणालय, चर्नी रोड/ रेल्वे एस.टी. पार्सल डेपो, मुंबई येथून/ येथपर्यंत) | | | |
|---|---|---|---|
| अ. क | पार्सल वनज | वाहतुकीचे दर (रूपये) हमाली, वाहतुक, मजूरी व वाहतुक व्यवस्थेच्या इतर खर्चासह **(जी.एस.टी.वगळून)**<br>वस्तू व सेवा भवन माझगांव पर्यत | वाहतुकीचे दर (रूपये) हमाली, वाहतुक, मजूरी व वाहतुक व्यवस्थेच्या इतर खर्चासह**(जी.एस.टी.सहीत)**<br>वस्तू व सेवा भवन माझगांव पर्यत |
| 1 | 2 | 3 | 4 |
| 1 | 100 कि. ग्रॅम पर्यत | | |
| 2 | 100 कि. ग्रॅम पेक्षा जास्त ते 250 कि. ग्रॅम | | |
| 3 | 250 कि. ग्रॅम पेक्षा जास्त ते 500 कि. ग्रॅम | | |
| 4 | 500 कि. ग्रॅम पेक्षा जास्त ते 750 कि. ग्रॅम | | |
| 5 | 750 कि. ग्रॅम पेक्षा जास्त ते 1 टनापर्यत | | |
| 6 | 1 टना पेक्षा जास्त ते 3 टनापर्यत | | |
| 7 | 3 टना पेक्षा जास्त ते 5 टनापर्यत | | |
| 8 | 5 टना पेक्षा जास्त ते 7 टनापर्यत | | |
| 9 | 7 टना पेक्षा जास्त ते 9 टनापर्यत | | |
| 10 | 9 टना पेक्षा जास्त ते 10 टनापर्यत | | |

| बाहेरगावासाठी वाहतुकीचे दर (संपूर्ण महाराष्ट्र राज्याकरीता) | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अनु. क्र | ठिकाण | वाहतुकीचे दर (रूपये) (हमाली, वाहतुक, मजूरी व वाहतुक व्यवस्थेच्या इतर खर्चासह) | | | | | |
| | | 3 टनापर्यंत (जी.एस.टी. वगळून) | 3 टनापर्यंत (जी.एस.टी. सहीत) | 3 टनापेक्षा जास्त ते 6 टनापर्यंत (जी.एस.टी. वगळून) | 3 टनापेक्षा जास्त ते 6 टनापर्यंत (जी.एस.टी. सहीत) | 6 टनापेक्षा जास्त ते 10 टनापर्यंत (जी.एस.टी. वगळून) | 6 टनापेक्षा जास्त ते 10 टनापर्यंत (जी.एस.टी. सहीत ) |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 1 | पुणे ते मुंबई | | | | | | |
| 2 | नाशिक ते मुंबई | | | | | | |
| 3 | औरंगाबाद ते मुंबई | | | | | | |
| 4 | कोल्हापूर ते मुंबई | | | | | | |
| 5 | नागपूर ते मुंबई | | | | | | |
| 6 | वाई ते मुंबई | | | | | | |

ही निविदा स्विकारण्यात आल्यास या सोबत जोडलेल्या ई–निविदेच्या अटी व शर्तीचे पालन व पूर्ती करण्याचे आणि त्यात कसूर झाल्यास सोबत जोडलेल्या शर्तीत उल्लेखलेल्या पैशाच्या रकमा गमाविण्याचा व ती रक्कम वस्तू व सेवा कर विभाग, महाराष्ट्र शासन यांना देण्याचे मी/आम्ही कबूल करीत आहे/आहोत.

1. निविदाकाराची स्वाक्षरी :
   नाव व पत्ता :
   संस्थेचा शिक्का :

**टिप :-१) दरपत्रक धारकांनी यादीत दिल्याप्रमाणे वाहतूक सेवांचा दर व निव्वळ G.S.T. वेगवेगळे नमूद करणे आवश्यक आहे.**

**२) व्यवसायकर नोंदणी प्रमाणपत्राची प्रत (Enrolment Cretificate) आवश्यक आहे.**

**३) दरपत्रक धारकांच्या वेगळया अटींचा व शर्तीचा विचार केला जाणार नाही.**

**४) अर्धवट दरपत्रके स्विकारली जाणार नाही.**

**५) शासकीय मुद्रणालयातून लेखनसामुग्री गाडीमध्ये भरणे व माझगाव कार्यालयातील गोडाउन पर्यंत उचलून आणणे याची सर्व जबाबदारी वाहतूकदाराची असणार आहे.**

**६) दरपत्रकातील ज्या दरपत्रक धारकाचे दर कमी असतील त्यानुसार स्विकृतीबाबत निर्णय घेण्यात येईल.**

**७) विहित मुदतीनंतर पुरवठा करण्यासंदर्भात आदेश निर्गमित झाल्यास ९० दिवसांपर्यंत स्विकृत दरात पुरवठा करणे आवश्यक राहिल**

## राज्यकर अधिकारी (आस्था - १२), विशेष राज्यकर आयुक्तांचे कार्यालय, लेखनसामुग्री विभागात संपूर्ण महाराष्ट्र राज्यातील लेखनसामुग्रीचा वाहतूक करार करणे या संबंधीचे सर्वसाधारण अटी व नियम.

| | |
|---|---|
| १ | वस्तू व सेवा कर कार्यालय, माझगाव व वांद्रे येथील कार्यालयांसाठी एक वर्ष कालावधीकरीता संपूर्ण महाराष्ट्र राज्यातील लेखनसामुग्रीचा वाहतूक करार करण्यासाठीचा करार कालावधी कराराच्या तारखेपासून एक वर्षाकरीता असेल. |
| २ | मोहोरबंद लिफाफ्यावर **"वस्तू व सेवा कर कार्यालय, माझगाव व वांद्रे येथील कार्यालयांसाठी लागणाऱ्या लेखनसामुग्रीची वाहतूक करण्याकरीता वाहतूक करार दरपत्रके "** असे लिहिणे आवश्यक आहे. |
| ३ | दरपत्रके भरुन सादर करावयाचे ठिकाण :- राज्यकर अधिकारी (आस्था-१२), विशेष राज्यकर आयुक्तांचे कार्यालय, लेखनसामुग्री विभाग, तळ मजला, जूनी इमारत, वस्तू व सेवा कर भवन, माझगांव, मुंबई - ४०० ०१० येथे दिनांक १२ जुलै, , २०२४ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत पाठविण्यात यावीत. त्यानंतर आलेली दरपत्रके स्विकारली जाणार नाहीत. |
| ४ | प्राप्त दरपत्रके दिनांक १६ जुलै,, २०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता (शक्य असल्यास) राज्यकर अधिकारी (आस्था-१२), विशेष राज्यकर आयुक्तांचे कार्यालय, लेखनसामुग्री विभाग, तळ मजला, जूनी इमारत, वस्तू व सेवा कर भवन, माझगांव, मुंबई - ४०० ०१० येथे उघडण्यात येतील. सदर दरपत्रक उघडते वेळी ठेकेदार किंवा त्यांचे प्रतिनिधी आवश्यक ते अधिकारपत्र घेऊन उपस्थित राहू शकतात. |
| ५ | ज्या कारणाकरीता दरपत्रक मागविण्यात आली आहे, त्या सर्वांचे दर त्या त्या रकान्यांसमोर लिहावेत. नमुद करण्यांत आलेले दर हे **सर्व त-हेच्या करासहीत असावेत.** कमीत कमी बाजारभाव किंवा प्रचलीत बाजारभाव असा शेरा असल्यास त्याचा स्विकार केला जाणार नाही. निव्वळ कमी दराची दरपत्रके स्विकारली जाईलच असे नाही. |
| ६ | कोणतीही दरपत्रके किंवा सर्व दरपत्रके कोणतेही कारण न देता स्विकारणे किंवा नामंजूर करण्याचा अधिकार, राज्यकर सहआयुक्त (मुख्यालय) २, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी स्वतः कडे राखून ठेवलेले आहेत. |
| ७ | दरपत्रकामधील परिमाण इत्यादींचा काळजीपूर्वक अभ्यास करुन दरपत्रकामधील प्रत्येक रकाना भरण्यांत यावा. दरपत्रक सादर केल्यानंतर त्यात कोणताही बदल करता येणार नाही, चुक झाली किंवा चुकीची समज झाली अशी कारणे नंतर ऐकली जाणार नाहीत. |
| ८ | दरपत्रक स्विकारण्यासंबधी मध्यस्थी करण्याचा / दबाब आणण्याचा प्रयत्न केल्यास आपले दरपत्रक रद्द करण्यात येईल. |
| ९ | दरपत्रकामधील महत्वाची व आवश्यक अशी अट आहे की, दरपत्रकामध्ये नमुद केलेली कोणतीही बाब पुरवठा धारक वेळेवर मागणी प्रमाणे वाहतूक करु शकत नसल्यास सदर वाहतूक राज्यकर सहआयुक्त (मुख्यालय) २, मुंबई हे बाहेरील वाहतूकदाराकडून करु शकतील. सदर केलेल्या सर्व वाहतूहीच्या खर्चाची रक्कम पुरवठा धारकास देणे बंधनकारक राहील. |
| १० | ज्या ठेकेदाराची दरपत्रके स्विकारण्यात येईल त्यांच्याजवळ तातडीच्या पुरवठयाकरीता किंवा तक्रारीचे निराकरण करण्याकरिता त्यांच्याशी संपर्क साधता येईल असा दूरध्वनी वा भ्रमणध्वनी असणे आवश्यक आहे. दूरध्वनी वा भ्रमणध्वनी नसेल तर ठेकेदाराने स्वत: किंवा त्यांच्या प्रतिनिधीने दररोज संबंधित कार्यालयास भेट देणे आवश्यक आहे. |
| ११ | ज्या ठेकेदाराची दरपत्रके स्विकृत केलेली आहे अशा ठेकेदारांची कंत्राट करारनाम्यावर स्वाक्षरी होत नाही व सुरक्षा ठेव रक्कम विहित मुदतीत भरण्यांत येत नाही, तोपर्यंत वाहतूक पुरवठादाराच्या देयकांच्या रकमेचे प्रदान केले जाणार नाही. |
| १२ | प्रत्येक ठेकेदाराचे आद्य कर्तव्य आहे की, जर तो एखादया काळया यादीत (BLACK LISTED) असलेल्या ठेकेदाराशी कोणत्याही प्रकारे संबंधित असेल तर त्याची संपूर्ण माहिती द्यावी. राज्यकर सहआयुक्त (मुख्यालय) २, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांची खात्री झाली की, सदर ठेकेदार हे दुसऱ्या ठेकेदारांशी आर्थिकदृष्टया मालक, नोकर, मध्यस्थी वा भागीदार या दृष्टीने संबंधित आहे व त्याचे नाव काळया यादीत आहे आणि ते वेगळे झाले आहेत किंवा वेगळया नावाचा वापर करीत आहेत, परंतु काळया यादीतील ठेकेदारांशी संबंध तोडलेले नाहीत व त्यांच्या नफयामध्ये भागीदार आहेत असे आढळून आले तर ठेकेदाराची दरपत्रक रद्द करुन त्यांची अनामत रक्कम जप्त केली जाईल. जर राज्यकर सहआयुक्त (मुख्यालय- २), महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना असे आढळून आले की, करार केलेल्या ठेकेदाराने संपूर्ण माहिती जाणूनबुजून दिलेली नाही व ते काळया यादीतील ठेकेदाराशी नफयाच्या दृष्टीने संबंधित आहे, अशावेळी राज्यकर सहआयुक्त (मुख्यालय) २, महाराष्ट्र राज्य, मुंबई सदर करारनामा रद्द करण्यास सक्षम आहेत. |
| १३ | प्रशासकिय कारणास्तव देयक अदा करण्यास विलंब झाल्यास विलंब आकार किंवा व्याज देय राहणार नाही. |

| | |
|---|---|
| १४ | दरपत्रक सादर करताना तांत्रिक दरपत्रक व आर्थिक दरपत्रक हे वेगवेगळया लिफाफ्यामध्ये सीलबंद करुन नंतर ती एका लिफाफ्यामध्ये घालून सादर करावे. |
| १५ | विहित कालावधीत प्राप्त झालेल्या सर्व दरपत्रकांच्या प्रथम तांत्रिक दरपत्रके उघडण्यात येतील व फक्त तांत्रिक छाननीमध्ये पात्र ठरलेल्या दरपत्रकधारकांचीच आर्थिक दरपत्रके उघडण्यात येतील, याची कृपया नोंद घ्यावी. |
| १६ | दरपत्रक स्विकृत झाल्यानंतर करारनाम्यावर दरपत्रकधारक / त्यांचे भागीदार / संचालक यांनी ठरवून दिलेल्या फॉर्मवर स्वाक्षरी करावी. जर दरपत्रकधारक / त्यांचे भागीदार / संचालक मुंबईत हजर नसतील किंवा जातीने स्वाक्षरीकरीता उपस्थित राहू शकणार नाहीत, तर त्यांच्यावतीने स्वाक्षरी करणाऱ्यास मुख्त्यारपत्र देणे आवश्यक आहे. |
| १७ | दरपत्रक स्विकारल्यानंतर सदर पुरवठा करणे वाहतूक पुरवठादारास अनिवार्य आहेच परंतु तांत्रिक बाबीमुळे प्रशासनाची आगामी वर्षाकरिता दरपत्रक मागविण्याची प्रक्रिया लाबंणीवर जात असेल तर प्रशासकीय विनंती नुसार सदर पुरवठा स्विकृत केलेल्या दरात जास्तीत जास्त वाढीव ९० दिवस कालावधी पर्यंत पुरवठादाराला त्यांनी मान्य केलेल्या दरानेच पुढील सेवा देणे बंधनकारक राहिल. |
| १८ | दरपत्रकधारकाने भरावयाची सुरक्षा ठेव रक्कम ही शासनाने ठरवुन दिलेल्या नमुन्यामध्ये शेडयुल बँकेची बँक गॅरंटी किंवा राष्ट्रीयकृत/शेडयुल बँकेच्या फिक्स डिपॉझीट या स्वरुपात, राज्यकर सहआयुक्त (मुख्यालय) २, मुंबई यांच्या नावाने द्यावी व त्याची मुदत दीड वर्षांची राहील. |
| १९ | यशस्वी दरपत्रक धारकाने, दरपत्रकातील अटी व शर्ती मान्य असल्याबाबत स्वतंत्रपणे रु. १००/- च्या स्टँप पेपरवर करार स्विकारल्यापासून १५ दिवसांमध्ये हमीपत्र या कार्यालयास सादर करणे अनिवार्य आहे. |
| २० | दरपत्रकाच्या नियमामध्ये व अटीमध्ये कोणत्याही प्रकारचा बदल मान्य होणार नाही. |
| २१ | **सादर करावयाची बंधनकारक (अनिवार्य / COMPULSORY) कागदपत्रे.**<br>१. व्यवसायकर नोंदणी प्रमाणपत्राची प्रत (**PTEC**)<br>२. वस्तू व सेवा कर कायदा २०१७ अनुसार माहे मे २०२४ चे GSTR-3B व GSTR-1 विवरणपत्राची प्रत.<br>३. पॅन क्रमांक व सन २०२१-२२, व २०२२-२३ व २०२३-२४ या आर्थिक वर्षांच्या आयकर विवरणपत्राची प्रत.<br>४. शासकीय / निमशासकीय / सार्वजनिक उपक्रमांच्या वाहतूक पुरवठा केला असल्याबाबत किमान १ वर्षाचे अनुभव प्रमाणपत्र.<br>५. Email ID, दूरध्वनी व भ्रमणध्वनी क्रमांक. |

| लिफाफा क्रमांक १ मध्ये खालील कागदपत्रे सादर करावीत :- (तांत्रिक दरपत्रक) | |
|---|---|
| १. | व्यवसायकर नोंदणी प्रमाणपत्राची प्रत (PTEC) (Compulsory) |
| २. | वस्तू व सेवा कर कायदा २०१७ अनुसार माहे जून २०२४ चे GSTR-3B व GSTR-1 विवरणपत्राची प्रत.(Compulsory) |
| ३. | पॅन क्रमांक व सन २०१७-१८,२०१८-१९ व २०१९-२० या आर्थिक वर्षांच्या आयकर विवरणपत्राची प्रत. (Compulsory) |
| ४. | शासकीय / निमशासकीय / सार्वजनिक उपक्रमांच्या वाहतूक पुरवठा केला असल्याबाबत किमान १ वर्षाचे अनुभव प्रमाणपत्र. (Compulsory) |
| ५. | Email ID, दूरध्वनी व भ्रमणध्वनी क्रमांक. (Compulsory) |

**लिफाफा क्रमांक २ मध्ये खालील कागदपत्रे सादर करावीत :- (आर्थिक दरपत्रक)**

**मुंबई विभागासाठी वाहतूकीचे दर**
**(शासकीय मुद्रणालय, चर्नी रोड/ रेल्वे एस.टी. पार्सल डेपो, मुंबई येथून/ येथपर्यत)**

| अ. क | पार्सल वनज | वाहतुकीचे दर (रूपये) हमाली, वाहतुक, मजूरी व वाहतुक व्यवस्थेच्या इतर खर्चासह (जी.एस.टी.वगळून) | वाहतुकीचे दर (रूपये) हमाली, वाहतुक, मजूरी व वाहतुक व्यवस्थेच्या इतर खर्चासह(जी.एस.टी.सहीत) |
|---|---|---|---|
| | | वस्तू व सेवा भवन माझगांव पर्यत | वस्तू व सेवा भवन माझगांव पर्यत |
| 1 | 2 | 3 | 4 |
| 1 | 100 कि. ग्रॅम पर्यत | | |
| 2 | 100 कि. ग्रॅम पेक्षा जास्त ते 250 कि. ग्रॅम | | |
| 3 | 250 कि. ग्रॅम पेक्षा जास्त ते 500 कि. ग्रॅम | | |
| 4 | 500 कि. ग्रॅम पेक्षा जास्त ते 750 कि. ग्रॅम | | |
| 5 | 750 कि. ग्रॅम पेक्षा जास्त ते 1 टनापर्यत | | |
| 6 | 1 टना पेक्षा जास्त ते 3 टनापर्यत | | |
| 7 | 3 टना पेक्षा जास्त ते 5 टनापर्यत | | |
| 8 | 5 टना पेक्षा जास्त ते 7 टनापर्यत | | |
| 9 | 7 टना पेक्षा जास्त ते 9 टनापर्यत | | |
| 10 | 9 टना पेक्षा जास्त ते 10 टनापर्यत | | |

**बाहेरगावासाठी वाहतुकीचे दर (संपूर्ण महाराष्ट्र राज्याकरीता) (आर्थिक दरपत्रक)**

| अनु. क | ठिकाण | वाहतुकीचे दर (रूपये) (हमाली, वाहतुक, मजूरी व वाहतुक व्यवस्थेच्या इतर खर्चासह) | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 3 टनापर्यत (जी.एस.टी. वगळून) | 3 टनापर्यत (जी.एस.टी. सहीत) | 3 टनापेक्षा जास्त ते 6 टनापर्यत (जी.एस.टी. वगळून) | 3 टनापेक्षा जास्त ते 6 टनापर्यत (जी.एस.टी. सहीत) | 6 टनापेक्षा जास्त ते 10 टनापर्यत (जी.एस.टी. वगळून) | 6 टनापेक्षा जास्त ते 10 टनापर्यत (जी.एस.टी. सहीत ) |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 1 | पुणे ते मुंबई | | | | | | |
| 2 | नाशिक ते मुंबई | | | | | | |
| 3 | औरंगाबाद ते मुंबई | | | | | | |
| 4 | कोल्हापूर ते मुंबई | | | | | | |
| 5 | नागपूर ते मुंबई | | | | | | |
| 6 | वाई ते मुंबई | | | | | | |

# महाराष्ट्र शासन

## वस्तू व सेवाकर विभाग

**(दरपत्रक स्विकारल्यानंतर पुरवठादाराने सादर करावयाचा नमुना)**

## संपूर्ण महाराष्ट्र राज्यातील लेखनसामुग्रीचा वाहतूक करार परिशिष्ट

| | |
|---|---|
| १) | मी, खाली स्वाक्षरी करणारा श्री.------------------------------------------------ असे लिहून देतो की, सोबत जोडलेल्या परिशिष्टातील रकान्यांसमोर लिहीलेल्या दराप्रमाणे दिनांक -----------------पर्यंत राज्यकर सहआयुक्त (मुख्यालय) २, मुंबई यांना व यांच्या वतीने, राज्यकर अधिकारी (आस्था-१२) लेखनसामुग्री विभाग, व वस्तू व सेवाकर भवन, माझगांव, मुंबई यांना वाहतूक करण्यांस बांधील राहीन. |
| २) | शासनाने रीतसर प्राधिकृत केलेल्या अधिकारानुसार राज्यकर अधिकारी (आस्था-१२) लेखनसामुग्री विभाग यांनी (यापुढे सदर अधिकारी संबोधावे) वस्तुंच्या वाहतूकीसंबंधीत घेतलेला निर्णय हा मला बंधनकारक राहील. |
| ३) | दरपत्रकामध्ये नमुद केलेली कोणतीही बाब मी वेळेवर मागणी प्रमाणे वाहतूक करु शकत नसल्यास, सदर वाहतूक राज्यकर सहआयुक्त (मुख्यालय) २, मुंबई हे इतर वाहतूकदाराकडून करु शकतील. सदर केलेल्या सर्व वाहतूकीच्या खर्चाची रक्कम मला देणे बंधनकारक राहील. |
| ४) | या प्रकरणात दरकरार मंजूर झाल्यानंतर १५ दिवसांच्या आत कंत्राट करारनामा करण्यास मी बांधील आहे. |
| ५) | ज्या ज्या वेळी आवश्यकता भासेल, त्यावेळी राज्यकर अधिकारी (आस्था-१२) यांचेकडे मी किंवा मी नेमुन दिलेला प्रतिनिधी पुरवठा करेल. तसेच मी, नेमून दिलेला प्रतिनिधी ही जबाबदार व्यक्ती असेल व हिशोब चोख ठेवील आणि त्याची ओळख सदर अधिका-यांना करुन देण्यांत येईल. |
| ६) | लेखनसामुग्रीच्या वाहतूकीचा पुरवठा झाल्यापासून तीन महिन्यात विजक (INVOICE) देण्यांत येईल. आणि जर कांही कारणास्तव बिजकामधील रक्कम कमी करावयाची असेल तर ती रक्कम मी कमी करीन. |
| ७) | जर माझ्याकडून कार्यालयांसाठी लागणा-या लेखनसामुग्रीचा पुरवठा करावयास सांगीतलेल्या दिनांकास वाहतूक झाली नसेल तर सदर आधिकारी स्वतःच्या अखत्यारीत मला प्रत्येक लेखनसामुग्रीच्या मालाची वाहतूक करावयाच्या दिवसानुसार रुपये- ५००/-(रुपये पाचशे फक्त) दंड करु शकतील. |
| ८) | नैसर्गिक आपत्तीमुळे उद्‌भवलेल्या प्रासंगिक परिस्थितीत नियमितपणे पुरवठा करण्यास मी बांधील आहे व जर मी असा नियमित पुरवठा करु शकलो नाही तर राज्यकर सहआयुक्त (मुख्यालय) २, मुंबई जो निवाडा देतील तो मला मान्य राहील. |
| ९) | माझे दरपत्रक स्विकारण्यात आल्यामुळे मला सुरक्षा ठेव रक्कम रुपये ------------------------ (रुपये ---------------- ----------------------) अंदाजीत रक्कमेच्या ३ टक्के बँक गॅरंटीच्या स्वरुपात भरणे मला बंधनकारक आहे. |
| १०) | दि. -------------------पर्यंतच्या कालावधीकरीता माझी दरपत्रक स्विकारल्यानंतर सदर लेखनसामुग्रीच्या वाहतूकीचा पुरवठा करणे मला अनिवार्य आहेच परंतु तांत्रिक बाबीमुळे प्रशासनाची आगामी वर्षाकरिता निविदा मागविण्याची प्रक्रिया लाबंणीवर जात असेल तर प्रशासकीय विनंती नुसार सदर पुरवठा स्विकृत केलेल्या दरात वाढीव ९० दिवसापर्यंत पुरवठा करण्याबाबत मी बांधील राहिन. |
| ११) | दरपत्रक करारनाम्यातील कालावधी संपल्यानंतर व ना-हरकत प्रमाणपत्र सादर केल्यानंतर सुरक्षा ठेव परत करण्यांस मी पात्र राहीन. |
| १२) | सुरक्षा ठेव रक्कम ही शासनाने ठरवुन दिलेल्या नमुन्यामध्ये शेडयुल बँकेची बँक गॅरेंटी किंवा राष्ट्रीयकृत/शेडयुल बँकेच्या फिक्स डिपॉझीट या स्वरुपात, राज्यकर सहआयुक्त (मुख्यालय-२), मुंबई यांच्या नावांने देणे मला आवश्यक आहे व त्याची मुदत दीड वर्षांची राहील. |
| १३) | निविदेत दर्शविलेल्या सर्व अटी व शर्ती मी संपूर्णतः वाचल्या असून त्या मला पूर्णतः कळलेल्या आहेत व त्याला माझी पूर्ण संमती आहे व त्यांना मी बांधील आहे. |

ठिकाण- मुंबई

दिनांक :-